वाचले- १) मा.जिल्हाधिकारी जळगाव यांचे कडील आदेश क्र./जमीन/१०८९/१५९२ दि.०८/११/१९८९
२) मा. जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कार्यालयाचा आदेश क्र.जमीन/१०९७/एसआर/१३५/९७ दि.१२/१२/१९९७.
३) अर्जदार श्री योगेश बाळकृष्ण बिर्ला रा.जळगांव ता. जि.जळगाव यांचा दि.२९/११/२०१९ चा अर्ज
४) सहा.संचालक नगर रचना जळगाव यांचेकडील जा.क्र.बांध.पर./मौजे सावखेडा ता.जळगांव/गट नं.१८२/१ भुक्र. १३ ते १४/१/ससं-जळ/८२९ दि.१३/०३/२०२०
५) तहसिलदार जळगांव यांचेकडील पत्र क्र.जमिन-१/ कावि/७४८/२०१९ दि.२१/०१/२०२०

---000---

क्र.जमीन/बांधकाम/एस.आर/२०२० /इटपाल/१२२८
उपविभागिय अधिकारी जळगाव
भाग जळगाव यांचे कार्यालय
जळगाव. दिनांक ३०/०९/ २०२०

**आदेश**

उपोदघातातील अ.न. ३ वरील विनंती अर्जान्वये श्री योगेश बाळकृष्ण बिर्ला रा.जळगांव ता. जि.जळगाव यांनी महानगरपालिका जळगाव यांच्या क्षेत्राच्या बाहेरील मौजे सावखेडा बु. ता. जि.जळगाव येथिल गट नं.१८२/१ मधील प्लॉट नं. १३ ते १४/१ चे एकुण क्षेत्र ५२५.०० चौ.मी. क्षेत्राच्या रहिवास वापरासाठी बांधकाम परवानगी मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपोदघातातील क्र.२ नुसार मा. जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कार्यालयाने बिनशेती परवानगी दिलेली आहे. तसेच उपोदघातातील क्र.४ नुसार सहाय्यक संचालक नगर रचना जळगाव यांनी दि. १३/०३/२०२० अन्वये अभिन्यास मंजुर केलेले आहेत. उपोदघातातील क्र.५ नुसार तहसिलदार जळगांव यांनी बांधकाम परवानगी देण्यास हरकत नाही असा अभिप्राय दिलेला आहे.

उपरोक्त विवेचनावरून आणि इकडील कार्यालयाचा उपोदघातातील क्र.२ अन्वये बिनशेती परवानगी दिलेली आहे. तसेच अर्जदार यांना अभिन्यासासाठी अनु.क्र.४ अन्वये सहाय्यक संचालक नगर रचना जळगाव यांनी शिफारस केलेली आहे . त्या अनुषंगाने उपोदघातातील क्रं.१ नमूद केलेल्या आदेशाअन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव मौजे सावखेडा बु. ता. जळगांव जि.जळगाव येथिल गट नं. १८२/१ मधील प्लॉट नं. १३ ते १४/१ चे एकुण क्षेत्र ५२५.०० चौ.मी. क्षेत्राचा रहिवास वापरासाठी बांधकाम आराखडयांना याद्वारे खालील अटीवर परवानगी देत आहे.

**अटी-**

१) बांधकामाच्या ठिकाणी डिसप्ले बोर्ड लावणे व त्यावर खालील प्रमाणे तपशिल नमुद करणे आवश्यक राहील.
अ) जागा मालकीची, डेव्हलपरची ,वास्तुतज्ञाची आणि कॉन्ट्रॅक्टरचे नाव व पत्ते
आ) स.न./सि.स.न./प्लॉट नं./बोर्ड नं.इ.भुखंडाचा तपशिल,
इ) बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक
ई) अनुज्ञेय करण्यात आलेले बांधीव क्षेत्र,
उ) निवासी गाळयांची व वाणिज्य गाळयाची संख्या व क्षेत्र,
ऊ) मंजुर नकाशाची प्रत ज्या ठिकाणी पहावयास मिळेल त्या ठिकाणाचा/कार्यालयाचा नाव व पत्ता,

२) रेनवॉटर हार्वेस्टिंग सिस्टीमची व्यवस्था व उचित ठिकाणी सोलर वॉटर सिस्टीमची व्यवस्था करणे अर्जदारास बंधनकारक राहील.
३) भुकंप विरोधक व्यवस्था अर्जदाराने करणे बंधनकारक राहील.
४) इमारतीचे बांधकाम करतांना बांधकाम साहित्यात प्लाय ॲश आधारीत वीटा व प्लाय ॲश अधिकृत साहित्याचा वापर करावा.
५) इमारतीमध्ये पिण्याचे पाण्याचे नळ, वॉश बेसीन,क्लीनर सीक,नळाच्या तोटया व यूरीनल्सची पुरेशी व्यवस्था अर्जदार यांनी करावी .
६) अभिन्यासातील क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था अर्जदार यांनी करावी , तसेच सांडपाण्याची निचऱ्याची व्यवस्थ सुदधा करावी .

७) अग्निशमनाची पुरेशी व्यवस्था अर्जदार यांनी स्वखर्चाने करावी.

८) जागेवर विदयुत वाहीनी असल्यास त्या अर्जावर यांनी स्वखर्चाने रस्त्याचे कडे वळवुन घ्याव्यात.

९) इमारतीकरीता वातायनाची व्यवस्था चटई क्षेत्राच्या १/१० पेक्षा कमी नसावी.

१०) सदरहू जागेतील सध्या अस्तित्वात असलेली झाडे विना परवानगीने तोडू नये.

११) सदरहू बांधकाम नकाशात पार्कीगसाठी दर्शविण्यात आलेली जागा कायम स्वरूपी मोकळी ठेवणे आवश्यक आहे. पार्कीगसाठी असलेली जागा पार्कींगसाठी वापरण्यात यावी त्यावर भविष्यात कोणतेही बांधकाम करण्यात येवु नये.

१२) सदरहू प्रकरणात करण्यात आलेली बांधकाम नकाशे ही सदर शिफारस केल्यापासून एक वर्ष कालावधीसाठी वैध राहील तदनंतर त्यास नियमानुसार मुदतवाढ घेणे बंधनकारक राहील.

१३) नियोजीत भुखंडावरील इमारत नकाशांना ज्या प्रयोजनासाठी बांधकाम मंजूरीची शिफारस केली आहे. त्या व्यतीरीक्त इतर प्रयोजनासाठी इमारतीचा उपयोग करता येणार नाही.

१४) सदरहू प्रकरणात बांधकाम नकाशांना मंजुरीची शिफारस करतांना अर्जदाराने प्रकरणा सोबत दाखल केलेली मालकी हक्काची कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहेत. सदर प्रकरणामध्ये भविष्यात दिशाभूल करणारी आढळून आल्यास सदर बांधकाम परवानगीचा आदेश रद्द समजण्यात येईल.

१५) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील अनुषंगीक तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील. त्यानुसार विकास शुल्क आकारणी योग्य राहील.

१६) सहा.संचालक नगर रचना जळगाव यांचेकडील जा.क्र.बांध.पर./मौजे सावखेडा बु. ता.जळगांव/गट नं.१८२/१/भुक्र. १३ ते १४/१/सस-जळ/८२९/जळगाव दि. १३/०३/२०२० मधील शर्तीचे पालन करणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.

१७) आदेशातील कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास सदर आदेश तात्काळ रद्द समजण्यात येईल.

(प्रसाद मते)
उपविभागीय अधिकारी
जळगाव भाग जळगाव

प्रत : - अर्जदार श्री योगेश बाळकृष्ण बिर्ला रा.जळगांव ता. जि.जळगाव
प्रत : - तहसिलदार जळगांव यांना माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी,

(प्रसाद मते)
उपविभागीय अधिकारी
जळगाव भाग जळगाव